Date
Page 1

# "परिवर्तन"

रेखाला ऑफीसमध्ये जाण्यासाठी आज जरा उशीरच झाला म्हणून लगबगीने तिने स्कुटी स्टार्ट केली, उगाचच थोडयासाठी लेट मार्क लागायाला नको. पण गाडी जणु कांही बैलगाडीच्या वेगाने जावू लागली, रस्त्यात ही तुफान गर्दी- ज्याला त्याला त्यांच्या ~~इच्छीत~~ इच्छीत स्थळी पोंहचायचे होते, अगदी मुंगीच्या पावलाने सगळे पुढे पुढे जात होते. तोंच विठ्ठल मंदिराच्या समोर एका वृध्द व्यक्तीला दुचाकीवाल्याचा धक्का लागला आणि तो व्यक्ती खाली पडली. लोक जमा झाले. कोणी स्कुटरवाल्याला पकडलं, तर कोणी आजोबांना उठवून उभे लागलं, ते बघू लागले.

रेखाही बाजूलाच होती. तिने पाण्याची बाटली काढली, दोन घोट पाणी द्यायाला म्हणून त्यांच्याजवळ गेली. आणि आजोबांना पाहुन म्हणाली, 'अरे, सर तुम्ही ??' लोकांना तिने सांगितले की, 'मी त्यांना ओळखते. ते माझ्या आधीच्या ऑफीसमधील माझे वरीष्ठ अधिकारी आहेत' असे म्हणत 'चला सर, तुमच्या पायाला आणि डोळ्याला लागलं आहे. एकटे कुठे चालला होतात एवढ्या धाईधाईत अन गर्दीत ?? समोरच डॉ. देशमुखांचा दवाखाना होता. इतर लोकांच्या मदतीने तिने त्यांना दवाखान्यात नेले, लोक हळूहळू काढता पाय घेवू लागले, त्यांच्याजवळ थांबायला कोणाला वेळ असणार ??

रेखाने तिच्या ऑफीसमध्ये फोन करुन घडलेली सगळी हकिकत सांगितली; व सुट्टी मागितली. डॉक्टरांना तिने ट्रीटमेंट सुरु करायाला सांगितले. दवाखान्यातील सगळे सोपस्कार पुरे, सलाईन वगैरे लावून झाल्यावर डॉक्टरांनी सांगितले की; चष्मा फुटल्यामुळे काच उजव्या डोळ्याला लागली, काही बारिक कण डोळ्यातही गेले होते ते आम्ही काढले. गुडघ्याला फ्रॅक्चर आहे ॲडमिट करावे लागेल. तिने त्यांच्या बॅगमधून मोबाईल काढला - घरी मुलाला कळवाले - ते येईपर्यंत मी थांबते असे म्हणून तिने सरांना आराम करायला सांगितले. औषधाच्या गुंगीमुळे

ते शांत पडून होते. जवळच्या खुर्चीत रेखा बसली. तिला सगळ्या जुन्या आठवणी येवू लागल्या. आज ती सुखाने आणि प्रतिष्ठितपणे जे जीवन जगते आहे त्यासाठी हे 'तिजारे सरच' कारणीभूत आहेत. त्यांनी योग्य वेळेत, योग्य मार्गदर्शन केले आणि आपल्या जीवनाची गाडी रुळावर आली. अन्यथा आज मी कुठे व कशी असते ?? खरंच, त्यावेळेस देवासारखे सर मदतीला धावून आले. आणि माझ्या जीवनाला स्थैर्य आले.

रेखाच्या नजरेसमोर भूतकाळातील आठवणींचा चित्रपट उलगडू लागला. लहानपणी सतत आईबाबांच्या भांडणामुळे तिला कुटुंबाचे सुख-प्रेम मिळाले नाही; घरात चौथं कोणी नसल्यामुळे तिचा स्वभाव एकलकोंडा झाला होता. त्यामुळे कोणाशी मैत्रीपण होत नव्हती. शाळेत असतांनाही एकटेपणामुळे तिला नकारात्मक विचारांनी घेरले. सगळ्यांना कसं छान छान जीवन जगायला मिळतं ? मलाच कां नाही ?? माझा काय दोष ?? इ. विचारांनी तिला आत्मकेंद्रित बनवलं. सगळ्या जगाची चीड यायची. त्याचाच परीणाम म्हणून की काय तिला वर्गातील मुलींचे पेन, पैसे, डबे, गृहपाठाची वही चोरण्याची वाईट सवय लागली. तिचा स्वभाव भांडकुदळ झाला. त्यामुळे कोणीच तिच्याशी बोलत नव्हते. शिक्षकांनी एक दोनदा समजावून सांगितले; पण ती ऐकत नाही हे लक्षात येताच ते पण दुर्लक्ष करु लागले. असे करता करताच ती मोठी झाली. बी कॉम झाली पण हातचलाखी करण्याची सवय कांही सुटेना !! बर ज्यां गोष्टी तिच्या कामाच्याही नव्हत्या, उपयोगाच्या नव्हत्या तरी ती चोरायची; त्यामुळे कोणाला तरी दुःख होतं नं, याचाच विकृत आनंद तिला मिळायचा.

योगायोगानेच रेखाला एका सहकारी पतपेढीत नोकरी मिळाली. तिथे तर सगळा पैशांचाच व्यवहार... अकाउंट बघण्यात ती हुशार होती. पण तिची सवय कांही तिचा

पिच्छा सोडेना !! सगळ्या सहकाऱ्यांच्या लक्षात ही गोष्ट आली; पण पुरावा मिळत नव्हता. वरच्या साहेबांपर्यंत तिची तक्रार गेली होती. एकदा तिच्या सहकारी मैत्रिणीने हिशोब करून पैसे मोजून ड्रावरमधे ठेवले. लंचनंतर ते जमा करायला गेली तेव्हा काही नोटा कमी भरल्या. ती घाबरली. ऑफीसच्या शिपायाने रेखाला ड्रावर उघडून काही नोटा पर्समध्ये ठेवतांना पाहीले होते. त्याने तसे मोठ्या साहेबांना सांगितले. आणि खरच, रेखाची पर्स चेक केल्यावर त्या नंबरच्या मागेपुढे असलेल्या नोटा सापडल्या.

साहेबांनी सगळ्यांना बाहेर पाठवले. फक्त रेखालाच केबिनमध्ये बोलावून असं का करतेस? मी आधीपासून ऐकतो आहे पण आज खात्री झाली... का असं वागतेस ?? आता तिवारी सर आपल्याला पोलीसात देतील, नोकरीवरून काढतील या भीतीने रेखाला आपण काय करत होतो, याचा असा भयंकर परीणाम होईल असे वाटलेच नव्हते. तीने लहानपणापासूनची सगळी हकीकत तिवारी सरांना सांगितली. थोडा वेळ विचार करून तिवारी सर म्हणाले 'रेखा, आम्ही तक्रार केली तर तुझ्यावर गुन्हेगारीचा कलंक लागेल, तुझे पुढचे आयुष्य बरबाद होवून जाईल. मग कुठेही नोकरी मिळणार नाही,

हे ऐकून रेखाला खुप पश्चाताप झाला. 'मी असं पुन्हा कधी कधी वागणार नाही, सर पण आता मला पोलीसात देवू नका म्हणून तिने सरांचे पाय धरून माफी मागीतली. सरांनी सांगितले की, 'तू स्वतःहून आजच्या आज राजीनामा दे, आणि पुन्हा असं वागू नकोस. प्रामाणिकपणे जीवनाची पुन्हा नवीन सुरवात कर'!! त्याप्रमाणे तीने राजीनामा दिला. खरच काय वेड्यासारखं करत होतो आपण ?? उगाचच दुसऱ्यांच्या वस्तू लंपास करून त्यांना त्रास देत होतो. तिवारी सरांच्या आपलेपणाच्या - स्नेहपूर्ण मार्गदर्शनामुळे तीने सुखाने

आणि प्रामाणिकपणे जगण्याची शपथ घेतली. कांही महीन्यांनी तिला एका मोठ्या ऑफीसमध्ये नोकरी मिळाली. मन लावून काम करत असल्यामुळे तिथे ती रुळली. मित्र मैत्रिणी मिळाल्या. त्यातल्याच रमेश प्रधानने तिला लग्नाबद्दल विचारले, आणि तिने होकार दिला, पण त्यापूर्वी तिच्या जीवनाची कहाणी त्याला सांगितली. त्याला तिचा खरेपणा आवडला, आणि मग दोघांनीही लग्न केले. सुखाचा संसार सुरु झाला. संसाराच्या वेलीवर सुनेत्रा आणि वेदांत फुलांप्रमाणे हसु डोलू लागले.

अधून मधून तिला लिमये सरांची आठवण यायची. आणि आज अपघातामुळे योगायोगानेच तिची लिमये सरांशी भेट झाली...

'बाबा कसे आहेत आता?' सरांच्या मुलाच्या बोलण्याने तिची विचारांची तंद्री भंगली; पूर्वीच्या आठवणीतून बाहेर आली. सरांच्या पत्नीला व मुलाला काय झालं ते सविस्तर सांगितलं. डॉक्टरांचाही राऊंड झालाच. तेव्हा त्यांनी पण रेखाचे कौतुक केले. वेळेवर दवाखान्यात आणले आता काळजीचे कारण नाही. फक्त पायाला प्लॅस्टर लागलं. सरांनाही गुंगीतून जाग आली. त्यांनी रेखाला शाबासकी दिली. उद्या रमेशला घेवून भेटायला येईन असं म्हणून तिने सगळ्यांचा निरोप घेतला. लिमये सरांना तिचे मनापासून कौतुक वाटले. १० वर्षापूर्वीच्या त्यांच्या एका सकारात्मक निर्णयामुळे रेखाचे आयुष्य मार्गी लागले हे बघून त्यांना खूप आनंद झाला !!

शब्दांकन - सौ विजया जोशी.      श्री विष्णू रामचंद्र उपाध्ये

